## निवडक



**पिळगाव : चांद सूर्य कोरलेल्या प्राचिन पाषाणावर कळसाचे विधिवत पूजन पुरोहित वैभवशात्री सायनेकर. सोबत पुजारी रत्नाकर गर्दे व गावकर मंडळी.**

### शांतादुर्गा पिळगावचा कळसोत्सव उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २ :** श्री शांतादुर्गा पिळगांव चा वार्षिक कळसोत्सव मंगळवार मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यांत आला. चैत्रशुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्या दिनी भक्त भाविकांना दर्शन देण्यासाठी श्रीशांतादुर्गेचा कलश पिळगावात घरोघरी गावकर मंडळी घेऊन जातात.घरोघरी कळसाचे विधिवत पूजन केले जाते. तीसऱ्या दिवशी रात्री सदर कळसाचे आगमन गिमोणे येथे श्रीराम मंदिरात व नंतर पुजारी गर्दे कुटुंबियांच्या घरी नेलं जातो. शेवटी ऐतिहासीक चांदसूर्य कोरलेल्या प्राचिन पाषाणावर कळस ठेऊन विधीवत पूजन केले जाते. नंतर पारंपरिक वाटेने कळस पुन्हा मंदिरात जातो व रात्री अग्निदिव्य होमकाण यातून देवीचा कळस गांवकर घेऊन जातात.

---

### हरमल पंचक्रोशीत २० रोजी गांधर्व महाविद्यालयाची परीक्षा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २ :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई व हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळ संचलित गायन, हार्मोनियम, तबला प्रवेशिका पूर्ण लिखित परीक्षा रविवार दि. २० रोजी, हरमल पंचक्रोशी हायस्कूलमध्ये घेण्यात येणार आहे.
यात गायन, हार्मोनीयम साठी लिखित परीक्षा सकाळच्या सत्रात ९ ते ११ या वेळेत तर तबला लिखित परीक्षा दुपारच्या सत्रात २ ते ४ या वेळेत घेतली जाईल. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या आधी अर्धा तास आपल्या फोटो ओळखपत्रासह उपस्थित राहावे, असे केंद्र व्यवस्थापक यांच्यातर्फे कळविण्यात आले आहे.

---

### आमोणा ॐ नमो ज्ञानेश्वर वारकरी मंडळातर्फे वारीच्या प्रवेशिका वितरित

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २ :** घाडीवाडा अमरावती आमोणा येथील ॐ नमो ज्ञानेश्वर माऊली वारकरी मंडळातर्फे यंदा ४ थ्या आषाढी एकादशी पायी वारीचे आयोजन करण्यात आले आहे. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्री रामपुरुष मंदिर घाडीवाडा आमोणा येथे प्रवेशिका वितरणाचा शुभारंभ करण्यात आला. प्रवेश शुल्क रु. २५०० भरून २७ एप्रिल २०२५ पर्यंत प्रवेशिका स्वीकारल्या जातील.
वारीचे प्रस्थान श्री रामपुरुष मंदिर घाडीवाडा आमोणा येथून २२ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजता होईल व शुक्रवार दि. ४ जुलै रोजी वारी पंढरपुरात दाखल होईल. वारीचा कालावधी १७ दिवस असेल. विर्डी, साखळी, पर्ये, आयी, माटणे, दोडामार्ग, भेडशी, वीजघर, तिलारीमार्गे पंढरपुरात जाईल. रविवार दि.६ जुलै रोजी आषाढी एकादशी करून रात्री १० वाजता पंढरपूर येथून परत निघेल.अधिक माहितीसाठी अध्यक्ष काशिनाथ म्हातो (९८२२५८६०३०), श्रीपाद घाडी (८५५४००९७७१), नवनाथ गावकर (७२६३०२०५६६) किंवा सुरेश घाडी (९३७०८४८२५५) यांच्याकडे संपर्क साधावा.

---

### बोरी येथील साई मंदिरात आज गुरुवार उत्सव

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. २ :** बोरी येथील साईबाबा सेवा मंडळ ट्रस्टच्या श्री साईबाबा मंदिरात गुरुवार दि. ३ रोजी गुरुवार उत्सव विविध कार्यक्रमानिशी साजरा केला जाणार आहे.
यानिमित्त पहाटे ५ वाजता साईंची धुपारती, रात्री ८ वाजता पालखी मिरवणूक काढली जाणार आहे. साईंच्या फुलांची पावणी व सर्व भाविकांना महाप्रसाद वाढला जाणार आहे.

# न्यूझीलंडचा सलग दुसरा विजय

## पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकली | मिचेल हेने नाबाद ९९ धावा केल्या

**हॅमिल्टन, दि. २ :**

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने पाकिस्तानचा ८४ धावांनी पराभव केला. यासह, किवी संघाने तीन सामन्यांची एकदिवसीय मालिकाही जिंकली. संघ मालिकेत २–० ने आघाडीवर आहे.

बुधवारी हॅमिल्टनमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने ५० षटकांत ८ गडी गमावून २९२ धावा केल्या. २९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ ४१.२ षटकांत २०८ धावांवर आटोपला.

न्यूझीलंडच्या मिचेल हेने नाबाद ९९ धावा केल्या. त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना ५ एप्रिल रोजी माउंट मौंगानुई येथे खेळला जाईल.

न्यूझीलंडकडून ७ व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मिचेल हेने ७८ चेंडूत नाबाद ९९ धावा केल्या. त्याच्याशिवाय, मुहम्मद अब्बासने ४१, निक केलीने ३१ आणि हेन्री निकोल्सने २२ धावा केल्या. मिशेलने ४ झेलही घेतले. पाकिस्तानकडून मोहम्मद वसीम आणि सुफियान मुकीम यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. फहीम अश्रफ, आकिफ जावेद आणि हरिस रौफ यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

२९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या पाकिस्तान संघाकडून फहीम अश्रफ आणि नसीम शाह यांनी अर्धशतके झळकावली. फहीमने ८० चेंडूत ७३ धावा केल्या आणि नसीमने ४४ चेंडूत ५१ धावा केल्या. पण, दोन्ही खेळाडू त्यांच्या संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरले. न्यूझीलंडकडून बेन सियर्सने ५ आणि जेकब डफीने ३ विकेट घेतल्या. नॅथन स्मिथ आणि विल ओ'रोर्क यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.



पहिल्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने पाकिस्तानचा ७३ धावांनी पराभव केला. ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना शनिवारी न्यूझीलंडमधील नेपियर येथे खेळवण्यात आला. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. किवी संघाने ९ विकेट्स गमावून ३४४ धावा केल्या होत्या. ३४५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ ४४.१ षटकात २७१ धावांवर आटोपला.

# जसप्रीत बुमराह लवकरच करणार कमबॅक!

**मुंबई, दि. २ :**

आयपीएल २०२५ दरम्यान मोठी बातमी समोर आली आहे, ज्यामुळे मुंबई इंडियन्सचे टेन्शन वाढू शकते. खरंतर, भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचे पुनरागमन लांबणीवर पडू शकते. मार्च महिन्यात आयपीमध्ये बुमराह मुंबईसाठी तीन सामने गमावण्याची शक्यता होती. आता बातमी अशी आहे की बुमराहच्या पुनरागमनाला आणखी काही वेळ लागू शकतो. मिळालेल्या माहितीनुसार, बुमराह किमान पुढील एक आठवडा तरी चालू आवृत्तीत खेळण्याची शक्यता कमी आहे.



बुमराह व्यतिरिक्त, आकाश दीपच्या पुनरागमनालाही वेळ लागू शकतो. आकाश दीप पुढील आठवड्यात परतण्याची अपेक्षा आहे. भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर दोन्ही खेळाडूंनी कोणत्याही प्रकारचे स्पर्धात्मक क्रिकेट खेळलेले नाही. या वर्षी जानेवारीमध्ये सिडनी कसोटीदरम्यान दुखापत झाल्यापासून बुमराह मैदानापासून दूर आहे. दरम्यान, लखनऊ सुपर जायंट्स आकाश दीपच्या पुनरागमनाची आतुरतेने वाट पाहत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आयपीएलनंतर लगेचच जूनमध्ये भारत इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार असल्याने बीसीसीआयची वैद्यकीय टीम बुमराहबाबत खूप सावधगिरी बाळगत आहे. जरी निवड समितीला तो युके दौऱ्यातील पाचही कसोटी सामने खेळेल अशी अपेक्षा नसली तरी, बुमराह किमान दोन किंवा तीन सामने खेळेल अशी अपेक्षा आहे.

बीसीसीआयच्या एका सूत्राने माहिती दिली की, बुमराहची दुखापत थोडी गंभीर आहे. वैद्यकीय पथकाला खात्री करायची आहे की त्यांना स्ट्रेस फ्रॅक्चर होणार नाही. बुमराह स्वतःही सावधगिरी बाळगत आहे. तो सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये गोलंदाजी करत आहे पण त्याला पूर्ण पुनरागमन करण्यासाठी जास्त वेळ लागू शकतो. अद्याप कोणतीही विशिष्ट वेळ निश्चित केलेली नाही, परंतु तो एप्रिलच्या मध्यापर्यंत परतण्याची अपेक्षा आहे. आकाश दीप देखील १० एप्रिलपर्यंत परतण्याची अपेक्षा आहे. आयपीएल २०२५ मध्ये बुमराह संघात येण्याची मुंबई इंडियन्स आतुरतेने वाट पाहत आहे. चालू हंगामात मुंबई इंडियन्सला ३ पैकी फक्त एकच सामना जिंकता आला आहे. मुंबई आता आपला पुढचा सामना ४ एप्रिल रोजी लखनऊविरुद्ध खेळेल.

# साखळी शिमगोत्सव समितीतर्फे स्पर्धांचा निकाल जाहीर

- चित्ररथ स्पर्धेत महालक्ष्मी समिती बांदोडा प्रथम
- रोमटामेळ स्पर्धेत सुयोग कला मंडळ आडपई प्रथम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २ :** साखळी शिमगोत्सव समितीतर्फे शिमगोत्सव २०२५ या अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा निकाल समितीने पत्रकार परिषद घेऊन जाहीर केला. या स्पर्धांमधील चित्ररथ स्पर्धेत प्रथम पारितोषिक महालक्ष्मी नागरिक समिती बांदोडा यांना रोमटामेळ स्पर्धेतील प्रथम पारितोषिक सुयोग कला मंडळ आडपई यांना लोकनृत्य स्पर्धेतील प्रथम पारितोषिक सरस्वती कला संघ कुर्टी यांना प्राप्त झाले आहे, अशी माहिती उत्सव समितीचे कार्याध्यक्ष दयानंद बोर्येकर यांनी दिली.

या पत्रकार परिषदेला सचिव संतोष भगत, उपाध्यक्षा नगराध्यक्षा सिद्धी प्रभू, चित्ररथ प्रमुख सुनील मोरजकर, रोमटामेळ प्रमुख अर्जुन कामत, वेशभूषा स्पर्धा प्रमूख वैशाली काणेकर यांची उपस्थिती होती.

चित्ररथ स्पर्धा निकाल – चित्ररथ स्पर्धेतील दुसरे बक्षीस त्रिवेणी कला संघ फोंडा, तिसरे बक्षीस कुंभारजुवा नागरिक समिती, चौथे श्री देव धाडेश्वर स्पोर्ट्स अँड कल्चरल नेरूळ, पाचवे श्री बालगोपाळ कला संस्कृती मंडळ चिंबल, सहावे आडपई युवक संघ आडपई फोंडा तर उत्तेजनार्थ बक्षीस हे देवतेवाडा युवक मंडळ कुडचडे, श्री राष्ट्रोळी सातेरी मंडळ म्हापसा, श्री देव राष्ट्रोळी कला मंडळ म्हापसा गिरी व देव बोडगेश्वर युवा संघ म्हापसा यांना प्राप्त झाली आहे.

रोमटामेळ स्पर्धा निकाल – रोमटामेळ स्पर्धेत दुसरे बक्षीस मांडलेश्वर शिमगोत्सव वाजे शिरोडा, तिसरे बक्षीस आवेडकर समाज बोरी, चौथे बक्षीस स्वर साई शिमगोत्सव मंडळ म्हापसा, पाचवे बक्षीस पाईकदेव शिमगोत्सव सांगे, सहावे बक्षीस कुडचडे काकोडा शिमगोत्सव मंडळ तर उत्तेजनार्थ बक्षीसे डोंगरी शिमगोत्सव मंडळ, हिंदवी स्वराज दिवाळी, खांडेपार शिमगोत्सव समिती, श्री शांतादुर्गा बोडगेश्वर, श्री शांतादुर्गा लक्ष्मी साखळ्यो, साई स्त्रीशक्ती संभाजीनगर, मुरगाव शिमगोत्सव समिती यांना प्राप्त झाली आहे.

लोकनृत्य स्पर्धा निकाल – लोकनृत्य स्पर्धेतील दुसरे बक्षीस सावईवेरेचो सख्या हरी, तिसरे बक्षीस श्री राम कला संघ फोंडा, चौथे बक्षीस विजया कला संघ कुर्टी, पाचवे बक्षीस टिटो स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लब पैंगिणी तर उत्तेजनार्थ बक्षीसे शांतादुर्गा शिवरंजन कला संघ, सातेरी सेल्फ हेल्प ग्रुप वेलींग म्हार्दोळ, परशुराम कला संघ काणकोण, दाडवंश केरी, भुईपाल धनगरी नृत्य व तालगडी यांना प्राप्त झाले आहे.

वेशभूषा स्पर्धांचा निकाल – अखिल गोवा १८ वर्षा वरील वेशभूषा स्पर्धेतील पहिले बक्षीस पूजा गावडे, दुसरे बक्षीस सिद्धेश मराठे, तिसरे बक्षीस शंकरनाथ पारवडकर, चौथे बक्षीस धनंजय नाईक, पाचवे बक्षीस रुपेश नाईक, सहावे बक्षीस वैभव देसाई, तर उत्तेजनार्थ मदन तारी, स्वप्निल नाईक, विहाल नाईक, जयेश दहिफोडे यांना प्राप्त झाली आहे.

अखिल गोवा वेशभूषा स्पर्धा १८ वर्षाखालील गटात पहिले बक्षीस कियान माधव नाईक, दुसरे बक्षीस विवान महाले, तिसरे बक्षीस पारस सातोडकर, चौथे बक्षीस मनस्वी रामनाथकर, पाचवे बक्षीस तनुश्री वाडेकर, सहावे बक्षीस आरोही वेर्णेकर तर अद्वैत शेटकर व पारधी वायंगणकर यांना उत्तेजनार्थ बक्षीसे प्राप्त झाली आहे.

साखळी मतदारसंघ पातळी वरील वेशभूषा स्पर्धेतील क गटात पहिले बक्षीस सावी गावस, दुसरे बक्षीस मृदा कर्पे, तिसरे बक्षीस अनिशा दळवी, चौथे बक्षीस शाश्वत देसाई, पाचवे बक्षीस दिव्यांश गावकर. स्थानिक पातळीवर घेण्यात आलेल्या वेशभूषेतील दुसऱ्या गटात पहिले बक्षीस संस्कार गावकर व दुसरे बक्षीस अवनी वेरेकर यांना प्राप्त झाले आहे.

# पंजाबचा ८ विकेट्सनी विजय

## प्रभसिमरन-श्रेयसची अर्धशतके : अर्शदीप सिंगने घेतल्या तीन विकेट

**लखनऊ, दि. २ :**

लखनऊने दिलेले १७२ धावांचे आव्हान १६.२ षटकातच पार करत पंजाबने ८ विकेट्सनी दणदणीत विजय साकारला. लखनौच्या धुवांधार फलंदाजांना १७१ धावांतच रोखत पंजाबने अर्धी मोहीम फत्ते केली होती. प्रभसिमरन सिंग आणि नेहल वढेरा यांनी जोरदार फटकेबाजी करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

नेहल वढेरा आणि श्रेयस अय्यर यांनी मनमुराद फटकेबाजी करत पंजाबला दिमाखदार विजय मिळवून दिला. दिग्वेश राठीच्या गोलंदाजीवर आयुष बदोनीने प्रभसिमरनचा झेल टिपला. स्वत: सीमारेषेपलीकडे जात असल्याचं लक्षात येताच बदोनीने चेंडू आत फेकला, रवी बिश्नोईने चपळतेने झेल पूर्ण केला. प्रभसिमरनने ३४ चेंडूत ६९ धावांची तडाखेबंद खेळी केली.

माफक लक्ष्याचा पाठलाग करताना प्रभसिमरन सिंगने लखनौच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला. अर्धशतकी खेळीसह प्रभसिमरनने पंजाबच्या विजयाचा पाया रचला आहे.

दिग्वेश राठीने लखनौला पहिलं यश मिळवून दिलं. त्याने प्रियांश आर्यला बाद केलं. प्रियांशने ८ धावा केल्या. विकेटनंतर प्रियांशने केलेलं सेलिब्रेशन सोशल मीडियावर व्हायरल झालं आहे.



पंजाबने शिस्तबद्ध गोलंदाजीच्या बळावर लखनौला १७१ धावांतच रोखले. मिचेल मार्श, निकोलस पूरन, ऋषभ पंत, डेव्हिड मिलर या फटकेबाजांना आवर घालत पंजाबने धावगतीला वेसण घातली. निकोलस पूरनने ४४ तर आयुष बदोनीने ४१ धावांची खेळी केली. पंजाबतर्फे अर्शदीपने ३ विकेट्स घेतल्या. अर्शदीप सिंगने शेवटच्या षटकात आयुष बदोनीपाठोपाठ अब्दुल समदलाही तंबूत धाडले. ३३ चेंडूत ४१ धावांची उपयुक्त खेळी करून आयुष बदोनी तंबूत परतला. अर्शदीप सिंगने त्याला बाद केले.

पहिल्या षटकात निकोलस पूरनच्या बॅटचा तडाखा झेललेल्या युझवेंद्र चहलने दुसऱ्या षटकात त्याचा अडसर दूर केला. पूरनने ३० चेंडूत ४४ धावा केल्या. मिचेल मार्श, एडन मारक्रम, ऋषभ पंत पाठोपाठ निकोलस पूरनही बाद झाल्याने लखनौच्या धावगतीला वेसण घातली आहे.

पंजाबचा प्रमुख फिरकीपटू असलेल्या युझवेंद्र चहलचे स्वागत निकोलस पूरनने चौकार आणि षटकाराने केलं. पूरनने चहलच्या पहिल्याच षटकात १५ धावा वसूल केल्या.

नव्या संघाकडून खेळताना मोठ्या खेळीसाठी प्रयत्नशील ऋषभ पंत ग्लेन मॅक्लवेलच्या गोलंदाजीवर बाद झाला. मॅक्सवेलच्या लेगस्टंपबाहेरच्या चेंडूवर खाली पडून स्वीप करण्याचा ऋषभचा प्रयत्न शॉर्ट फाईनलेगला युझवेंद्र चहलच्या हातात जाऊन विसावला. लॉकी फर्ग्युसनच्या गोलंदाजीवर एडन मारक्रमने चौकार आणि षटकार वसूल केला. मात्र पुढच्याच चेंडूवर फर्ग्युसनने मारक्रमला त्रिफळाचीत केलं. मारक्रमने १८ चेंडूत २८ धावा केल्या.

लखनौच्या एडन मारक्रमने अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीवर दोन चौकार वसूल केले. डावखुऱ्या अर्शदीप सिंगने धोकादायक मिचेल मार्शला भोपळाही फोडू दिला नाही.

पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेकीचा कौल जिंकला असून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. अष्टपैलू ओमरझाईऐवजी वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनला अंतिम अकरात समाविष्ट करण्यात आलं आहे. लखनौच्या संघात कोणताही बदल झालेला नाही.

लखनौच्या अटलबिहारी वाजपेयी एकाना स्टेडियमवर यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच लढत होत आहे. संथ आणि धीम्या स्वरुपाची ही खेळपट्टी फिरकीला साथ देण्याची शक्यता आहे. दवाचा मुद्दा कळीचा ठरू शकतो. पंजाबसाठी विजयकुमार व्यशकने टिच्चून गोलंदाजी केली आहे. पण खेळपट्टी फिरकीला साथ देणारी असल्यास व्यशकऐवजी हरप्रीत ब्रारला संधी मिळू शकते.

लखनौनं सलामीच्या लढतीत २०९ धावांचा डोंगर उभारला. उत्तरार्धात लखनौचीच सामन्यावर पकड होती पण आशुतोष शर्माच्या तडाखेबंद खेळीच्या जोरावर दिल्लीने एका विकेटने थरारक विजय मिळवला. पंजाबनेही सलामीच्या लढतीत २४३ धावांचा डोंगर उभारला. गुजरातने चांगली टक्कर देत २३२ धावांची मजल मारली. पंजाबने ११ धावांनी विजय मिळवला.

तडाखेबंद फटकेबाजीसाठी प्रसिद्ध हैदराबादला लखनौनं १९० धावांतच रोखलं. मिचेल मार्श आणि निकोलस पूरन यांच्या वादळी खेळींच्या जोरावर लखनौनं १६ षटकातच हे लक्ष्य गाठलं.

यंदाच्या हंगामापूर्वी झालेल्या लिलावात पंजाब किंग्ज संघाने श्रेयस अय्यरसाठी तब्बल २६.७५ कोटींची बोली लावून त्याला ताफ्यात समाविष्ट केलं.

# पार्सेकर महाविद्यालयातर्फे 'सर्व समावेशित शिक्षण'वर परिसंवाद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १ :** गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि समाज कल्याण खाते गोवा सरकार यांच्या सहयोगातून पणजी येथे सर्वसमावेशित शिक्षण विषयावर राष्ट्रीय परिसंवाद नुकताच झाला.

सदर दोन दिवसीय कार्यक्रम पणजी संस्कृती भवनात झाला. या परिसंवादामध्ये राष्ट्रीय स्तरावरील तज्ञांनी आपली मते मांडली. पहिल्या दिवशी उदघाटन समारंभ पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई उपस्थित होते. तसेच अजित पंचवाडकर (संचालक, समाज कल्याण विभाग, गोवा), गुरुप्रसाद पावसकर (संचालक, दिव्यांग विभाग) लक्ष्मीकांत पार्सेकर (माजी मुख्यमंत्री आणि अध्यक्ष हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळ), प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित, प्रा. प्रतिभा पाटणकर (माजी विभाग प्रमुख – शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) उपस्थित होते. सुभाष फळदेसाई यांनी आस्था या दिव्यांगांच्या शाळेविषयी गौरव उद्गार काढले. सर्वसमावेशित शिक्षणाविषयी सर्वतोपरी सहाय्य करण्यास प्रशासनाची तयारी दर्शवली. लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी आपल्या शिक्षण संस्थेमार्फत सर्वसमावेशित शिक्षणासाठी घेत असलेल्या प्रयत्नांविषयी आढावा घेतला.



**पणजी : राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन करताना मंत्री सुभाष फळदेसाई. सोबत चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर, प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित, अजित पंचवाडकर, गुरुप्रसाद पावसकर व इतर.**

पहिल्या दिवशी प्रमुख वक्त्यांची मार्गदर्शन सत्रे पार पडली. यावेळी विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तीही सहभागी झाल्या. दुसऱ्या दिवशी तज्ज्ञ मार्गदर्शन सत्र पार पडले आणि पथक चर्चा आयोजित करण्यात आली. पथक चर्चेत सहभागी विषय तज्ञानी आपले विषय सविस्तर मांडले. याचे संचालन प्रकाश कामत (सामाजिक कार्यकर्ते) यांनी केले. यामध्ये श्रीमती पूर्वा, दीपाली कोरडे, रिबेका मनारी, आशिता अब्राहम, अनुषा दोषी, आणि डॉ. गार्गी सिन्हा ह्यांचा सहभाग होता. अंतिम सत्रात कार्यक्रमाची सांगता झाली. या समारोपाच्या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित, उदेश नाटेकर (प्रशासक, हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळ), परिसंवादाच्या संयोजिका प्रा. कविता नायर आणि सह संयोजक प्रा. विश्वेश फात्रेकर उपस्थित होते. उदेश नाटेकर यांनी सर्वसमावेशित शिक्षणाविषयी आपले मत मांडले. प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित यांनी दोन दिवशीय परिसंवादाच्या आयोजनाविषयी आणि यशस्वीतेविषयी समाधान व्यक्त केले. प्रा. कविता नायर यांनी परिसंवादाचा आढावा घेतला आणि प्रा. विश्वेश फात्रेकर यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 210 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .